**<u>ठळक बातम्या</u>**

- संसदेचं हिवाळी अधिवेशन संस्थगित/ लोकसभेत १११ टक्के तर राज्यसभेत १२१ टक्के विधायक कामकाज

- तंत्रज्ञानाची आव्हानं ओळखून जागतिक दर्जाचे सनदी अधिकारी घडवण्यावर लोक सेवा आयोगांनी लक्ष केंद्रित करावं असं राष्ट्रपतींचं आवाहन

- ६४ व्या गोवा मुक्ती दिनानिमित्त विविध कार्यक्रम

- 'इंटरनॅशनल स्पेस ॲप्स चॅलेंज २०२५', या जागतिक हॅकेथॉन मध्ये 'फोटोनिक्स ओडिसी' या भारतीय संघाला विजेतपद

**आणि**

- भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका पाचवा आणि शेवटचा टी-२० क्रिकेट सामना आज अहमदाबादमध्ये रंगणार

**<><><><><>**

संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज आज अनिश्चित काळासाठी तहकूब झालं.

- **- - बाईट- सभापती ओम बिरला - - -**

लोकसभेत सभापती ओम बिरला यांनी सांगितलं की या अधिवेशनात सभागृहाच्या १५ बैठका झाल्या आणि त्यात १११ टक्के विधायक कामकाज झालं.

राज्यसभेत सभागृहाच्या कामकाजात वारंवार व्यत्यय येत असल्याबद्दल अध्यक्ष सी पी राधाकृष्णन यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. सदस्यांनी आत्मपरीक्षण करावं असं आवाहन त्यांनी केलं. सभागृहात ९२ तास प्रत्यक्ष कामकाज झालं असून १२१ टक्के उत्पादकता राहीली, असं उपराष्ट्रपतींनी सांगितलं. जी-रामजी विधेयकावरच्या चर्चेसाठी मध्यरात्रीपर्यंत सभागृहाचं कामकाज चालल्याचा उल्लेख त्यांनी केला. सभागृहाचे अध्यक्ष या नात्याने आपलं पहिलंच अधिवेशन होतं असं सांगून राधाकृष्णन यांनी उपाध्यक्ष, तालिका सदस्य, सभागृह नेते, आणि विरोधी पक्ष नेते यांचे आभार मानले.

१ डिसेंबर पासून सुरु झालेल्या या हिवाळी अधिवेशनात वंदे मातरम्, निवडणूक सुधारणा, रोजगार, विमा क्षेत्रातल्या सुधारणा तसंच ऊर्जा सुरक्षा यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा झाली. या अधिवेशनात एकूण पाच महत्त्वाची विधेयकं मंजूर करण्यात आली. त्यात विकसित भारत रोजगार हमी उपजीविका विधेयक, शांती विधेयक, विमा सुधारणा विधेयक तसंच निरसन आणि सुधारणा विधेयकांचा समावेश आहे.

दरम्यान, मनरेगा ऐवजी विबी जी-रामजी राबवण्याच्या विधेयका विरोधात विरोधीपक्षांच्या खासदारांनी आजही संसदभवन परिसरात निदर्शनं केली.

**<><><><><>**

बदलत्या तंत्रज्ञानातली आव्हानं ओळखून जागतिक दर्जाचे सनदी अधिकारी घडवण्यावर लोक सेवा आयोगांनी लक्ष केंद्रित करावं असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. हैद्राबादमध्ये आयोजित देशातल्या लोकसेवा आयोगांच्या अध्यक्षांच्या राष्ट्रीय परिषदेचं उदघाटन करताना त्या आज बोलत होत्या.

- **- -होल्ड - बाईट - - -**

याआधी बोलताना तेलंगणाचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी सनदी अधिकाऱ्यांच्या भरती प्रक्रियेत पारदर्शकता आणणे आणि भरती वेळापत्रक काटेकोरपणे राबविण्यावर भर दिला होता.

संघ लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष अजय कुमार आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

पारंपरिक औषधशास्त्रावर नवी दिल्लीत सुरू असलेल्या जागतिक आरोग्य संघटनेच्या आंतरराष्ट्रीय शिखर परिषदेचा आज समारोप होणार आहे. या समारोप समारंभात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अनेक आयुष उपक्रमांचा प्रारंभ केला जाणार आहे. माय आयुष सर्वसमावेशक सेवा पोर्टल, आयुष मार्क या प्रमाणिकरणाचा यामधे समावेश आहे. या कार्यक्रमात२०२१ ते २०२५ या काळात योग प्रसार आणि विकासामध्ये उल्लेखनीय काम केलेल्या व्यक्तींना प्रधानमंत्र्यांच्या हस्ते पुरस्कार दिला जाणार आहे.

**<><><><><>**

६४ वा गोवा मुक्ती दिन आज साजरा होत आहे. १९६१ साली गोव्याला पोर्तुगीज राजवटीपासून स्वातंत्र्य मिळालं.

गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी आज गोवा मुक्ती दिनानिमित्त तिरंगा ध्वज फडकावला आणि नंतर पोलीस आणि इतर सुरक्षा दलांच्या संचलनाची मानवंदना स्वीकारली. गोव्याच्या नागरिकांनी निसर्ग सौंदर्यानं संपन्न असलेलं आपलं राज्य स्वच्छ ठेवण्याचा आणि इथली शांतता अबाधित ठेवण्याचा संकल्प करावा, असं आवाहन त्यांनी केलं.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गोवा मुक्तीसाठी लढा देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांचा अढळ संकल्प आणि समर्पणाबद्दल आदर व्यक्त केला आहे. या शूरवीरांचं देश कृतज्ञतेने स्मरण करत असल्याचं त्यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अन्यायाविरोधात लढा देणाऱ्या शूर वीरांचं स्मरण केलं आहे. गोव्याच्या नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांचं बलिदान सरकार आणि नागरिकांना गोव्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी काम करण्याची प्रेरणा देत आहे, असं त्यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी गोवा मुक्ती दिनानिमित्त गोव्याच्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. गोवा मुक्तीसाठी अपार कष्ट घेणाऱ्या लढवय्यांप्रति त्यांनी आदर व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

अमेरिकेच्या ‘नासा’ या अंतराळ संशोधन संस्थेच्या ‘इंटरनॅशनल स्पेस ॲप्स चॅलेंज २०२५’, या जागतिक हॅकेथॉन मध्ये ‘फोटोनिक्स ओडिसी’ हा भारतीय संघ विजेता ठरला आहे. दुर्गम भागात ब्रॉडबँड सेवेची पोहोच वाढवण्यासाठी फोटोनिक्स ओडिसी या संघानं सादर केलेल्या उपग्रह इंटरनेट पायाभूत सुविधेच्या प्रारूपाला हा पुरस्कार मिळाला. भारतातल्या ७ कोटी पेक्षा जास्त लोकांना ब्रॉडबँड सेवेशी जोडून, जमिनीवरच्या दूरसंवाद माध्यमांवरचं त्यांचं अवलंबित्व कमी करणं, हे या संकल्पनेचं उद्दिष्ट आहे.

अमेरिकेची नासा, ही संस्था २०१२ साला पासून, ‘इंटरनॅशनल स्पेस ॲप्स चॅलेंज’ जागतिक हॅकेथॉन आयोजित करते. यंदा जगभरात विविध ठिकाणी आयोजित केलेल्या या

स्पर्धेत १ लाख १४ हजारापेक्षा जास्त स्पर्धक सहभागी झाल्याचं नासाच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

<><><><>

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आर्थिक वर्ष २०२६ साठीच्या राष्ट्रीय संरक्षण प्रमाणीकरण कायद्यावर स्वाक्षरी केली आहे. मुक्त आणि शांततापूर्ण हिंद प्रशांत क्षेत्रासाठी भारत आणि क्वाड देशांबरोबर संबंध सुधारण्यासाठी  आणि चीनने उभ्या केलेल्या आव्हानांना तोंड देण्यासाठी या कायद्याचं महत्व आहे. अमेरिकन सरकारच्या युद्ध विभागाचा ‘सामर्थ्याच्या माध्यमातून शांतता’ हा कार्यक्रम राबवून अमेरिकेची अंतर्गत सुरक्षा व्यवस्था आणि संरक्षण उद्योग बळकट करण्यासाठी हा कायदा उपयोगी ठरेल असं ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

या कायद्यामध्ये भारताला अमेरिकेचा महत्त्वाचा मित्रदेश मानलं गेलं असून अमेरिका आणि भारत यांच्यात २००८ साली झालेल्या अणुकराराचा संयुक्त आढावा घेण्याची तरतूद या कायद्यात आहे.

<><><><>

युक्रेनला ९० अब्ज युरो कर्ज देण्यावर युरोपियन युनियनच्या नेत्यांनी सहमती दर्शवली  आहे. युक्रेनला साहाय्य करण्यासाठी रशियाच्या गोठवलेल्या संपत्तीचा वापर करण्यावर  सहमती न झाल्यामुळे युरोपियन युनियननं या निर्णयाला अर्थसंकल्पीय समर्थन दिलं. ब्रुसेल्स इथल्या  शिखर परिषदेत झालेल्या चर्चेनंतर हा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार, ही कर्जाची रक्कम पुढली दोन वर्ष युक्रेनची लष्करी आणि आर्थिक गरज पूर्ण करेल असा युरोपियन युनियनचा अंदाज आहे.

<><><><>

छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात आज सकाळपासून सुरक्षा दलं आणि नक्षलींमध्ये चकमक सुरु आहे. भैरमगढ इंद्रावती भागात काही नक्षली  असल्याच्या माहितीवरून जिल्हा राखीव पोलीस दलानं राबवलेल्या मोहिमे दरम्यान, हा हल्ला झाल्याचं पोलिसांनी म्हटलं आहे. सुकमा जिल्ह्यात काल झालेल्या  चकमकीत तीन नक्षली ठार झाले होते.

<><><><>

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातला पाचवा आणि शेवटचा टी-२० क्रिकेट सामना आज अहमदाबादमध्ये नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणार आहे. सामना संध्याकाळी सात वाजता सुरू होईल.

सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ २-१ नं  आघाडीवर आहे. बुधवारी लखनौच्या एकाना स्टेडियमवर झालेला चौथा टी-२० सामना धुक्यामुळे रद्द करण्यात आला होता.

<><><><><>

चीनमध्ये आज संध्याकाळी होणाऱ्या ‘BWF वर्ल्ड टूर फायनल्स’ बॅडमिंटन गट स्पर्धेच्या अंतिम फेरीत, भारताच्या सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीचा सामना मलेशियाच्या आरोन चिया आणि सोह वूई यिक या जोडीबरोबर होणार आहे.

<><><><><>

देशाच्या उत्तर भागात थंडीचा जोर असून धुक्याचा दाट थर पसरला आहे. उत्तर प्रदेश आणि हरियाणामध्ये आजपासून २१ डिसेंबरपर्यंत सकाळी आणि रात्री दाट ते अतिदाट धुक्याची शक्यता आहे. पंजाब, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, ओडिशा आणि झारखंडमध्येही हीच स्थिती कायम राहील असा अंदाज आहे.

धुक्यानं दृष्यमानता कमी झाल्यामुळे देशातल्या रेल्वे आणि विमान वाहतुकीवर परिणाम झाला आहे. सुमारे ६० गाड्या उशिराने धावत आहेत. प्रवाशांनी स्थानकावर जाण्यापूर्वी गाडीच्या सद्यस्थितीची खातरजमा करुन घ्यावी, असं रेल्वेने सांगितलं आहे.

//<><><><><>//